**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ , अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त द्वितीय अपिल**

**अपिल क्र.१४२१/२०११**
जा.क्र.
दिनांक -

अर्जदार तथा अपिलकर्ता
श्री शिवाजी सहादु वानखेडे
मु.उमरा दे. पो.लोणी गवळी
ता.मेहकर जि.बुलडाणा

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, मेंहकर जि.बुलडाणा

२. जन माहिती अधिकारी (प्र-२) तथा
निवासी नायब तहसीलदार,
मेहकर जि.बुलडाणा

**(आदेश पारीत दिनांक ०५/०१/२०१२)**

**- निर्णय -**

अर्जदार तथा अपिलकर्ता गैरहजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी तर्फे श्री एस.एस.गायकवाड, कनिष्ठ लिपीक, तहसील कार्यालय, मेहकर हजर आहे.

अर्जदार तथा अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये जोडपत्र-अ नुसार दि. १४/३/११ रोजी वि.तहसीलदार, मेहकर यांचेकडे अर्ज करुन माहिती मागितली होती. अर्जदाराला प्रस्तृतकार-२ कडुन ५/५/११ ला माहिती देण्यात आली असे श्री गायकवाड यांनी आज सुनावणी दरम्यान सांगितले. अर्जदार गैरहजर असल्यामुळे याबाबत शहानिशा झाला नाही. अर्जदाराचा हक्क सोडण्याबाबतचा वाद आहे व त्यासंबंधी अर्जदाराने अपील केले आहे व ते प्रलंबित आहे असे सुध्दा उत्तरवादीच्या प्रतिनिधीने सांगितले. माहिती अधिकाराअंतर्गत मागितलेली माहिती पुरविली असल्याचे सांगण्यात आले.

सुनावणीनंतर उशिरा १२.३० वाजता अर्जदार या आयोगासमोर हजर झालेत व माहिती खोटी दिली असल्याचे अर्जदाराने सांगितले. दिलेली माहिती खोटी कशी आहे यासंबंधी अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे लेखी निवेदन द्यावे व त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी शहानिशा करुन अर्जदाराला लेखी कळवावे व तसा अहवाल या आयोगास पाठवावा.

वरीलप्रमाणे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

जिसकार/